*पुनर्नियुक्तीवरील निवृत्तिवेतनधारक-*
*सुधारित वेतनश्रेणीतील वेतनाचे विनियमन.*

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

निर्णय क्रमांक : पुनिवे-१००१/२४२/सेवा-४ ,
मंत्रालय , मुंबई- ४०००३२ , दिनांक ६ ऑगस्ट २००१.

## निर्णय

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ च्या नियम २ (२) (ग) नुसार जे शासकीय कर्मचारी ३१ डिसेंबर १९९५ रोजी किंवा तत्पूर्वी सेवानिवृत्त झाले, आणि ज्यांना सेवानिवृत्तीनंतर त्या तारखेस पुन्हा नियुक्त करण्यात आले आणि ज्यांचा सेवानिवृत्तीनंतरचा पुनर्नियुक्तीचा कालावधी त्या तारखेनंतर वाढवून दिलेला आहे, अशांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ लागू नाहीत. अशा व्यक्तींना सुधारित वेतनश्रेणीचा लाभ देण्यात यावा का व त्यांचे सुधारित वेतनश्रेणीत वेतन कशाप्रकारे निश्चित करावे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन आता असा निदेश देत आहे की, सुधारित वेतनश्रेणीचा लाभ १ जानेवारी १९९६ रोजी पुनर्नियुक्तीवर असलेल्या निवृत्तिवेतनधारकांना , या आदेशात पुढे नमूद केलेल्या तरतुदींच्या अधीन राहून देण्यात यावा. अशा व्यक्तींना (अ) त्या दिनांकाला त्यांना लागू असलेल्या विद्यमान वेतनश्रेणीत वेतन घेणे चालू ठेवणे अथवा (ब) १ जानेवारी १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी स्वीकारणे, यापैकी एक विकल्प निवडण्याची संधी देण्यात यावी. हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत आवश्यक तो विकल्प देण्यात यावा. या कालमर्यादेपूर्वी विकल्प न दिल्यास पुनर्नियुक्तीवरील निवृत्तिवेतनधारकाने १ जानेवारी १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी निवडली असे समजण्यात येईल. जे निवृत्तिवेतनधारक १ जानेवारी १९९६ ला पुनर्नियुक्तीवर होते, परंतु ज्यांचा पुनर्नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आलेला आहे व जे निवृत्तिवेतनधारक सध्या शासन सेवेत नाहीत, अशा निवृत्तिवेतनधारकांच्या निदर्शनास हे आदेश आणण्यात यावेत.

३. निवृत्तिवेतन किंवा निवृत्तिवेतनविषयक इतर लाभ घेऊन सेवानिवृत्त झालेला आणि ज्याचे पुनर्नियुक्तीवरील वेतन, हे लाभ किंवा त्याचा काही भाग वगळून निश्चित करण्यात आले आहे, अशा पुनर्नियुक्तीवर असलेल्या निवृत्तिवेतनधारकाने १ जानेवारी १९९६ पासून सुधारित वेतनश्रेणी निवडली असेल किंवा सुधारित वेतनश्रेणी निवडल्याचे समजण्यात आले असेल तेथे, त्याचे सुधारित वेतनश्रेणीतील वेतन हे विद्यमान वेतनश्रेणीतील विद्यमान वित्तलब्धी (निवृत्तिवेतन धरुन) अधिक विद्यमान श्रेणीतील मूळ वेतनाच्या ४० टक्के एवढया टप्प्यावर निश्चित करण्यात यावे. अशा रीतीने काढण्यात आलेली रक्कम सुधारित वेतनश्रेणीतील टप्प्यात बसत नसेल तर वेतन अगोदरच्या टप्प्याला निश्चित करण्यात यावे व त्यामधील फरक हा "वैयक्तिक वेतन" म्हणून देण्यात यावा. अशा रीतीने काढण्यात आलेली रक्कम सुधारित वेतनश्रेणीच्या किमान वेतनापेक्षा कमी असेल तर वेतन , किमान वेतनाच्या टप्प्याला निश्चित करण्यात यावे. म्हणजेच "सुधारित वेतनश्रेणीचे किमान वेतन वजा निवृत्तिवेतन " असे वेतन देण्यात यावे, अशा रीतीने काढण्यात आलेली रक्कम सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल वेतनापेक्षा जास्त येत असेल तर वेतन, कमाल वेतनाच्या टप्प्याला निश्चित करण्यात यावे व त्यामधील फरक हा "वैयक्तिक वेतन" म्हणून देण्यात यावा. अशा सर्व प्रकरणात निवृत्तिवेतन हे स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

एच-564(13,000+40-8-01)1

या प्रयोजनासाठी "विद्यमान वेतनश्रेणीतील विद्यमान वित्तलब्धी" मध्ये पुढील रकमांचा समावेश असेल-

(ए) विद्यमान श्रेणीतील मूळ वेतन ,

(बी) मूळ वेतनास अनुरुप असा १ जानेवारी १९९६ रोजी अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता,

(सी) विद्यमान श्रेणीतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय असलेली पहिली अंतरिम वाढ आणि दुसरी अंतरिम वाढ आणि

(डी) असल्यास, विद्यमान श्रेणीतील वैयक्तिक वेतन.

४. जेथे पुनर्नियुक्तीवरील निवृत्तिवेतनधारकाने विद्यमान वेतनश्रेणीत त्याचे वेतन घेण्याचा आणि कॅलेण्डर वर्ष १९९६ मध्ये त्याला ज्या दिनांकाला वेतनवाढ देय आहे, त्या दिनांकापासून सुधारित वेतनश्रेणीचा पर्याय निवडला असेल, त्यांचे सुधारित वेतनश्रेणीतील वेतन देखील वेतनवाढीच्या दिनांकापासून वरील तरतुदीनुसार निश्चित करण्यात यावे.

५. सुधारित वेतनश्रेणीतील पुढील वेतनवाढ, विद्यमान वेतनश्रेणीत ज्या दिनांकाला वेतनवाढ देण्यात आली असती तो दिनांक किंवा सुधारित वेतनश्रेणीत ज्या दिनांकाला वेतनवाढ देय असेल तो दिनांक, यापैकी जो अगोदरचा दिनांक असेल त्या दिनांकाला देण्यात यावी.

६. जेथे पुनर्नियुक्तीवरील निवृत्तिवेतनधारक विद्यमान वेतनश्रेणीत वेतन घेणे चालू ठेवण्याचा पर्याय निवडील, तेथे त्याचे वेतन पुन्हा निश्चित केले जाणार नाही आणि वेतनश्रेणीत सुधारणा झालीच नाही, असे समजून तो वेतन घेणे चालू ठेवील.

७. या प्रयोजनासाठी "निवृत्तिवेतन" म्हणजे,यथास्थिती,शासन निर्णय , वित्त विभाग क्रमांकः सेनिवे-१०९९/३०३/सेवा-४, दिनांक १५ नोव्हेंबर १९९९ व क्र. सेनिवे-१०९९/३०४/सेवा-४, दि. १५ नोव्हेंबर १९९९ प्रमाणे अथवा केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे सुधारित झालेले "निवृत्तिवेतन" होय. म्हणून पुनर्नियुक्तीवर असलेल्या सर्व निवृत्तिवेतनधारकांना त्यांचे सुधारित निवृत्तिवेतन लक्षात घेऊन सुधारित वेतनश्रेणीतील वेतन निश्चित करण्यासाठी, त्यांच्या १ जानेवारी १९९६ पासून सुधारित झालेल्या निवृत्तिवेतनाची रक्कम ते ज्या कार्यालय प्रमुखाकडे काम करीत आहेत/होते, त्यांना कळविणे आवश्यक राहिल.

८. हे आदेश जेथे पुनर्नियुक्तीवरील निवृत्तिवेतनधारकाचे वेतन, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील, यथास्थिती, नियम १५७ किंवा नियम १६२ च्या तरतुदीनुसार निश्चित करण्यात आले आहे अशा प्रकरणी लागू राहतील.

९. या आदेशानुसार निवृत्तिवेतनधारकांस पुनर्नियुक्त करण्यास सक्षम असणारा प्राधिकारी, पुनर्नियुक्तीवर असलेल्या निवृत्तिवेतनधारकाचे वेतन निश्चित करील. तथापि महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ प्रमाणे करण्यात आलेली वेतननिश्चिती पडताळून पाहण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या वेतन पडताळणी पथकाकडून ही वेतननिश्चिती पडताळून पहाण्यात येईल.

१०. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वसन्त वा.चौधरी ,
शासनाचे उप सचिव.

एच–564(13,000+40–8–01)1अ

भारत सरकारचे सचिव, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
मुख्य लेखा अधिकारी, बी ब्लॉक, दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली (५ प्रती),
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली (१० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (२५ प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई (५०० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

*पत्राद्वारे.

*Re-employed pensioners-*
*Regulation of pay in the revised pay-scales.*

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## Finance Department

Resolution No.REP- 1001/242/SER-4,
Mantralaya, Mumbai - 400 032 dated 6th August 2001.

## RESOLUTION

The Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 1998 are not applicable to Government servants who retired on or before 31st December 1995 and who were on re-employment on that date, including those whose period of re-employment extended after that date, vide Rule 2(2) (g) thereof. The question of extension of benefit of the revised pay-scales to such persons and the manner in which their pay should be fixed in the revised pay-scales has been under consideration of Government.

2. Government is now pleased to direct that the benefit of the revised pay-scales should be extended to those pensioners who were on re-employment on 1st January 1996 , subject to the orders hereinafter contained. Such persons should be given an option either (a) to continue to draw pay in the existing scales applicable to them on that date, or (b) to come to the revised scales with effect from 1st January 1996 . Necessary option should be exercised within three months of the date of issue of these orders, failing which the re-employed pensioners shall be deemed to have elected the revised scales of pay with effect from 1st Jaunary 1996 . These orders may be brought to the notice of the pensioners who were on re-employment on 1st January 1996 but whose re-employment period is over and are not in service now.

3. Where the re-employed pensioner, who retired with a pension or any other retirement benefits and whose pay was fixed on re-employment with reference to these benefits or ignoring a part thereof, elects or is deemed to have elected to move to the revised scale from 1st January 1996, his pay in the revised scale should be fixed at the stage equal to his existing emoluments in the existing scale (inclusive of pension) plus an amount representing 40% of the basic pay in the existing scale. If the amount so arrived at, is not a stage in the revised scale, the pay should be fixed at the stage next below that amount, the difference being granted as "personal pay". If the amount so arrived at, is less than minimum of the revised scale, the pay should be fixed at the minimum i.e. he should be given the "minimum of the revised scale minus pension". If the amount so arrived at, exceeds the maximum of the revised scale, the pay should be fixed at the maximum, the difference being allowed as "personal pay". In all these cases the pension will be drawn as a separate entity.

एच-564(13,000+40-8-01)3

For this purpose, the "existing emoluments in the existing scale" should include-

(a) the basic pay in the existing scale;
(b) dearness allowance admissible as on 1st January 1996 on the basic pay;
(c) the amounts of first interim relief and second interim relief admissible on the basic pay in the existing scale; and
(d) Personal pay, in the existing scale, if any.

4 Where a re-employed pensioner elects to draw his pay in the existing scale and opts to be brought over to the revised scale from the date of increment falling during calender year 1996, his pay from the date of increment in the revised scale shall also be fixed in accordance with the above provisions.

5. The next increment in the revised scale should be allowed on the date on which an increment would have been earned in the existing scale or on the date on which an increment falls due in the revised scale, whichever is earlier.

6. Where the re-employed pensioner elects to continue to draw pay in the existing scale, there will be no refixation of his pay and he should continue to draw pay as if there was no revision of pay-scale.

7. For this purpose, " Pension" means the pension as revised under Government Resolution, Finance Department, No.PEN-1099/ 303/SER-4,dated 15th November 1999 and No.PEN-1099/ 304/SER-4, dated 15th November 1999 or the orders issued by Government of India, as the case may be. All re-employed pensioners would, therefore, be required to intimate to the Heads of Offices in which they are/were working, the amount of pension so revised with effect from 1st January 1996 for the purpose of fixation of their pay in the revised scale after taking into account their revised pension.

**8. These orders are applicable where the pay of re-employed pensioner has been fixed in accordance with provisions contained in Rule 157 or Rule 162, as the case may be, of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982.**

9. The pay of the re-employed pensioners under these orders shall be fixed by the authority which is competent to re-employ a pensioner. However, verification of pay in such cases will be done by the Pay Verification Unit, set up for the said purpose under the Maharashtra Civil Services (Revised Pay) Rules, 1998.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**VASANT W. CHAUDHARI,**
**Deputy Secretary to Government.**

---

एच-564(13,000+40-8-01)3अ.